# हे हाता शरणागता

पोलिओने निकामी झालेल्या
प्राणहीन हातांचे जड ओझे वागवीत
तू गाण्याच्या मैफिलीत प्रवेश केलास तेव्हा
हाताशिवायही नमस्कार करता येतो,
हे आम्ही पाहून ठेवले....
नंतर गाताना डोळयांनी रागाचा
विस्तार दाखवलास, स्वरांचे आगतस्वागत केलेस
नम्र, कृतज्ञ यजमानासारखे, तेव्हा
त्यातले अगत्य आमच्याही अंगावर सांडले;
कृतज्ञतेची लाट पापणीच्या किनाऱ्यावर आदळली
आमच्याही

मैफिलीत मध्येच केव्हा
दे हाता शरणागता आळविलेस डोळयांत
खिन्न आर्जवाची लेणी मिरवीत तेव्हा
गाण्याचा मूळ अर्थच बदलला.
दिशादिशांतून नंतर
हातच हात आले, वाढतच गेले...
की म्हणू विस्तारली तुझी
असहायता सर्वत्र?

तू पायांना हात केलेस पेटी वाजविणारे,
अणुहून सूक्ष्म शक्यतेचा
जिद्दीने विस्फोट करीत.
खुर्चीवर बसून डाव्या पायाने भाता ओढीत
उजव्या पायाच्या बोटांनी

एका सप्तकातून दुसऱ्यात झर्रकन गेलास, तेव्हा
भल्याभल्यांचे हात शरमिंदे झाले.
आता अश्वमेधाच्या घोडयासारख्या तुझ्या अजित पायांना
तुझ्यासारखे पराक्रमी लवांकुशच अडवू शकतील.

शेवटी दोनच प्रश्न.

एकः हातांशिवायही गात गात
तू नियतीबरोबर चालावेस ही तो भगवंताची इच्छा;
हे पूर्ण उमगल्यासारखे कृतज्ञ डोळे
आस्तिकांची घरे पेटवीत कुठे निघालेत?

दोनः मैफल संपता संपता
"चलो एक बार फिरसे
अजनबी बन जाये हम दोनो".
असा निर्वाणीचा निरोप कशासाठी घेतलास?
असं अजनबी परत परत होता येतं?

द.भा.धामणस्कर
(प्राक्तनाचे संदर्भ)

आपण सगळयांनीच असे कलाविष्कार बघितले आहेत. खरं सांगू का? मला हे असे कलावन्त बघताना स्वतःच्या अकर्तृत्वाची शरम वाटते, ह्या कलावन्तांविषयी अपार कौतुक वाटतं आणि देवाने ह्यांच्या वाटयाला असे दुःख का दिलं या विचाराने मनात काहूर उठते.

One mustn't criticize other people on grounds where he can't stand perpendicular himself असे Mark Twain ने म्हटले आहे.
ह्या कलावन्तांच्या समोर ताठ मानेने उभे रहायलासुद्धा मला

लाज वाटते, टीका कसली करणार?
अशा लोकांच्या समोर मला माझ्या कुठल्याही (तथाकथित) यशाचा उल्लेखही करायचे धाडस होत नाही.

देव आहे की नाही, देव सर्वांचे भलेच करतो का अशा चर्चा मग निरर्थक वाटायला लागतात आणि परमेश्वराला रिटायर करा हाच घोष मनात सुरु होतो.

इतके उत्कृष्ट सांगितिक बुद्धिमत्ता असणाऱ्या या कलावंताला देवाने दोन धडधाकट हात दिले असते तर काय बहार झाली असती असेच सतत वाटत रहाते. पण हयांना त्याचे काहीच नसते, आपल्याच आनन्दात मग्न असतात ते.

दादरच्या कमला मेहता अंधशाळेतल्या योगिता तांबेने पद्मजा फेणाणीच्या गझलला साथ करतांना जीवघेणी लग्गी लावली तेव्हा डोळयातले अश्रू अनावर होऊन मी सभागृहाच्या बाहेर पडलो होतो.

माझ्या सुदैवाने, अशा अनेक, शरीराने अपंग पण मनाने आणि कृतीने अधिक कणखर व्यक्तिंचा थोडाफार सहवास मला लाभला आणि माझ्यापरीने त्यांची सेवा करण्याचे भाग्यही लाभले.
नांदेडमधल्या शेतमजूराचा जन्मांध मुलगा असून मुंबईत येऊन BA करता सरकारी हॉस्टेलमध्ये राहून शिक्षण घेणारा बाविस्कर हा माझा मित्र किंवा मूक-बधीर असून स्वतःचा व्यवसाय धाडसाने करणारा विश्वास केतकर हे मोठे कलाकार नसतील पण जेव्हा ते शान्तपणे बसून गाण्याच्या लकेरी मारतात तेव्हा त्यांच्या गळयात सरस्वतीच असल्याचा मला भास होतो.

हे सगळे लोक माझ्यासाठी कधीच अजनबी होऊ शकणार नाहीत. ते कायमचे माझ्या मनात वस्तीला आले आहेत. त्यांच्या सोबतीने मी खूप समृद्ध झालो आहे.

आता असाच एक रोमांचक अनुभव लिहून इथेच थांबतो.

यिटझ्हॅक पेर्लमान (Itzhak Perlman) हा आजच्या काळातील एक श्रेष्ठ व्हायोलिनवादक आहे. तुम्ही शिंडलर्स लिस्ट हा अजरामर चित्रपट बाघितला असेल तर त्यातील पेर्लमान ने वाजविलेले सोलो व्हायोलिन पीसेस तुमच्या नक्कीच स्मरणात असतील. पेर्लमान ला वायाच्या चौथ्या वर्षी पोलियो झाला आणि तेव्हापासून तो कुबडया घेऊन फिरतो. गेल्या काही वर्षांत त्याची चालण्याची गती मंदावली आहे.
पेर्लमान चा एक कार्यक्रम सुरु होत होता. निवेदन संपले आणि अतिशय संथगतीने पेर्लमान रंगमंचावर आला. जेमतेम ४० फूट अंतर पार करायला त्याला जवळजवळ दहा मिनिटे लागली. कुबडया सहाय्यकाच्या हातात दिल्या आणि खुर्चीवर बसून त्याने व्हायोलिन स्वरात जुळवायला सुरुवात केली. टण्ण...आवाज झाला आणि सभागृहातल्या प्रत्येकाच्या लक्षात आलं की व्हायोलिनची षड्जाची तार तुटली आहे...
...आता पेर्लमान परत विंगेत जाणार, तार दुरुस्त करणार ( पेर्लमान त्याच्या नियमाप्रमाणे चारही तारा बदलणार )... त्याला त्याकरता होणारे कष्ट कोणालाच बघवले नसते. त्याच्या एका खुणेसरशी कुठलाही प्रेक्षक त्याला हवी ती मदत करायला तयार होता.

पेर्लमानने फक्त सगळयांकडे बघून स्मितहास्य केले आणि काहीच घडले नाही अशा थाटात बाकीच्या तीनही तारा जुळविल्या आणि

पियानोवर साथ करणाऱ्या त्याच्या साथीदाराला खूण केली.
Concert सुरु झाला.
पुढील पाउण तास सगळे प्रेक्षागृह पेर्लमानच्या प्रतिभेने गुंग झाले होते.
सर्वच compositions नेहमीच्याच सहजतेने वाजत होत्या, ह्या व्हायोलिनला तीनच तारा आहेत हे आम्ही सगळे विसरुन गेलो होतो.

मध्यंतर झाले तेव्हा त्याने सांगितले की सर्व तारा बदलायला लागणार असल्यामुळे तो १५ मिनिटांऐवजी ३० मिनिटे मध्यंतर घेऊ इच्छितो.

हे ऐकल्यावर आम्ही सगळे भानावर आलो आणि standing ovation बरोबर टाळयांचा जो कडकडाट सुरु झाला तो पेर्लमान त्याच्या चालीने विंगेत गेला तरी थांबेचना.

**मन्दार**